औषधे, तद्अनुषंगिक उपभोग्य वस्तु व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो- फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८

गो.ते.रुग्णालय आवार,

१०वा, मजला, नवीन मंत्रालय, मुंबई

दिनांक : **२७ मार्च, २०१९**

वाचा :-

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१६/प्र.क्र२४०/आरोग्य-८ दि. २६जुलै, २०१७

प्रस्तावना :-

शासन निर्णय दिनांक २६.०७.२०१७ अन्वये हाफकीन बायो- फार्मास्टुटीकल्स कॉर्पोरेशन मुंबई अंतर्गत खरेदी कक्ष स्थापन करुन हाफकीन बायो- फार्मास्टुटीकल्स यांच्याकडुनच औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तु व वैद्यकीय उपकरणे खरेदी करणे बंधनकारक करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले होते, त्याअनुषंगाने रुपये ३.०० लाख व त्या आतील खरेदी संस्थास्तरावर करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

शासन शुध्दीपत्रकः-

सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व शासनाचे अन्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थासाठी लागणाऱ्या औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तु व वैद्यकीय उपकरणे यांची बाबनिहाय रुपये ३.०० लाख मर्यादेपर्यंतची खरेदी ही उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भागiii/उदयोग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन दरपत्रकाच्या आधारे संस्थास्तरावर खरेदी करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०३२८१२५४१४८८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.03.29 12:26:29 +05'30'

(ज.स. तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव
६. मा. मंत्री (अन्न आणि औषध प्रशासन) यांचे खाजगी सचिव
७. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुंटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव
८. मा.विरोधी पक्षनेता ,विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक
११. अपर मुख्य सचिव (नियोजन), यांचे स्वीय सहाय्यक
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, (सा.आ. व कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक
१३. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१४. प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१५. प्रधान सचिव, उद्योग विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१७. प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१८. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१९. सचिव , महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
२०. सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
२१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई

२२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२६. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक ,राष्ट्रीय आरोग्य अभियान ,मुंबई
२७. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., परेल , मुंबई
२८. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, परेल, मुंबई
२९. आयुक्त ,अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन ,मुंबई
३०. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र एड्स नियंत्रण संस्था, मुंबई
३१. आयुक्त (विकास), उद्योग संचालनालय, मुंबई
३२. संचालक ,लेखा व कोषागारे ,मुंबई
३३. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
३५. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
३६. उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
३७. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
३८. सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
३९. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
४०. सर्व मंत्रालयीन विभाग
४१. निवडनस्ती